
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महाड सत्याग्रहामागील भूमिका व यशस्विता

प्रमोद एस. मेश्राम
सहयोगी प्राध्यापक, श्री. मनोहर हरी खापणे कला व वाणिज्य महाविद्यालय, पाचल,
ता. राजापूर, जि. रत्नागिरी.

**प्रस्तावनाः**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित सत्याग्रहापूर्वी महाराष्ट्रात ज्या-ज्या पूर्वाश्रमींच्या अस्पृश्यांनी अस्पृश्य समाजात समाजजागृतीचे कार्य केले, त्यालाच आंबेडकर पूर्व चळवळ असे मानले जाते. महात्मा फुलेंपासून प्रेरणा घेऊन अनेक समाजसुधारकांनी स्वतःच्या जीवाचे रान करून समाजात जागृतीयुक्त सुधारणा करण्याच्या प्रयत्न केला. एकोणिसाव्या शतकाच्या दशकात खऱ्या अर्थाने गोपाळ बाबा वलंगकरांनी महात्मा फुलेंपासून प्रेरणा घेऊन कृतिशील कार्याला सुरवात केली. त्यानंतर इतर कार्यकर्त्यांनी आपल्या सामाजिक व धार्मिक कार्याला सुरवात केली. १९२० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांची चळवळ स्वतःच्या हाती घेऊन मानव मुक्तीच्या कार्याला सुरवात केली. त्यामुळे अस्पृश्यांच्या चळवळीला खऱ्या अर्थाने अधिक महत्व १९२० नंतर प्राप्त झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या सर्वांगिण जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी व बलशाली भारत बनविण्यासाठी जे-जे कार्य केले ते सर्वच कार्य जागतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्वाचे मानले जाते. त्यांनी खऱ्या अर्थाने अस्पृश्यांच्या चळवळीत प्राण ओतून संपूर्ण भारतातील लोकांना अस्पृश्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे आकर्षित केले. अज्ञानी, निद्रिस्त समाजाला जागृत करण्यासाठी ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक या पाक्षिकाची सुरवात करून सामाजिक बांधणी करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली. समाजात जागृती झाल्यानंतर अस्पृश्य समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सत्याग्रहाची भूमिका आखून त्याची कृतिशील अंमलबजावणी केली. त्यामुळे खऱ्या अर्थाने अस्पृश्य समाजाला हजारो वर्षांच्या दास्यातून मुक्तता करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या सत्याग्रहाला सुरूवात करून त्याची यशस्विता सिद्ध केली. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या महाडच्या सत्याग्रहाला जागतिक दृष्टिकोनातून विसाव्या शतकात महत्वाचे स्थान आहे.

## अस्पृश्यांची समाजातील स्थितीः

मूळच्या भारताच्या इतिहासातील अस्पृश्यांचा इतिहास संघर्षमय आहे. उच्चभ्रू समाजाकडून चार वर्णाची ताठर चातुर्वर्ण्य व्यवस्था निर्माण करण्यात आली. वर्णव्यवस्थाही कठोर होती. कुछ विव्दानों का माना है की वर्णव्यवस्था उतनी ही कठोर थी जितनी आज जाती व्यवस्था है।[१] त्यामुळे वर्णव्यवस्थेलाही महत्वपूर्ण स्थान होते असे मानले जाते. मनुस्मृतीनुसार वर्ण हे ईश्वरनिर्मित असल्याचे मानले जाते. या व्यवस्थेवर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जोपर्यंत वर्णव्यवस्था कायम आहे तोपर्यंतच ब्राह्मण वर्गाचे श्रेष्ठपण कायम आहे.[२] या वर्णव्यवस्थेमुळे समाज दुभंगला गेला. ही उच्चवर्णीयांनी निर्माण केलेली व्यवस्था पूर्णतः दोषयुक्त आहे.

प्राचीन काळापासून समाजातील जातिव्यवस्थेने जातीनुरूप वेगवेगळे नियम, कायदेकानून, चालीरीती निर्माण केल्यामुळे या जातींनी समाजाला विभक्त केले. प्रत्येकाची जात जन्मावरून ठरविली जात होती. ही व्यवस्था निश्चित केव्हा उत्पन्न झाली याबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. असे मानले जाते की, 'गुप्त काल तक जातिव्यवस्था बहुत कठोर हो गई तथा अन्य सभी जातियों के उपर ब्राह्मणों का वर्चस्व स्थापित हो गया।'[३] समाजाच्या मान्यतेमुळेच ती समाजात अधिक घट्ट व रूढ होत गेली. या जातींचा अभ्यासअनेक समाजशास्त्रज्ञांनी केला. यासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग कितीही नालायक अशो त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही.'[४] या जातींच्या उत्पत्तीबाबत सांगताना ते म्हणतात, '(....) अस्पृश्यांना नेमून दिलेल्या गावगाड्यातील कामामुळे अस्पृश्यांचा वरच्या वर्गाशी संपर्क येत राहिला व या संपर्कातून अस्पृश्य वर्ग वरच्या वर्गाचे अनुकरण करू लागला. जाती या सुद्धा अनुकरणातून निर्माण झाल्या. जाती निर्मितीत पहिल्या प्रथम ब्राह्मणांनी स्वतःला बंदिस्त करून घेतले व स्वतःची जात निर्माण केली. याचेच अनुकरण अन्य समाजे केले व त्यामुळे जाती पडल्या.'[५] गुप्तोत्तर काळात स्थानिक जातींची प्रक्रिया वेगाने घडून आली.

समाजातील वर्ण व जातिव्यवस्थेमुळे अस्पृश्यांची समाजातील स्थिती अत्यंत हलाखीची बनली. समाजातील अस्पृश्यतमुळे अस्पृश्यांचे अतोनात नुकसान झाले. अस्पृश्यतेचा उद्याचा काळ डॉ. बाबासाहेबांनी इ.स. ४०० असा निश्चित केला. ही अस्पृश्यांची अस्पृश्यता कायम स्वरूपाची होती. भारतातील सहा कोटी लोकांना या व्यवस्थेने बरबाद केले. या अस्पृश्यांचा कसलाही विकास बौद्ध धम्माच्या स्वीकारापर्यंत झाला नाही. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्य समाजातील महार हा हरकाम्या नोकर होता. त्यामुळे सर्व प्रकाराची कामे त्याला करावी लागत असत. जीवन जगण्यासाठी इतरही कामे करावी लागत असत. चोवीस तास काम करूनही कधीही त्यांना सुख मिळाले नाही. मंदिरे, रस्ते, पाणवठे, शाळा, बस, रेल्वे या सार्वजनिक उपयोगाच्या बाबी अस्पृश्यांसाठी बंद होत्या.

जीवन जगण्यासाठी आवश्यक गरजा पूर्वाश्रमीच्या महारांना मिळत नव्हत्या. पाण्यावाचून महारांचे अधिक हाल झाले. याबाबत डॉ. के. के. चौधरी म्हणतात की, 'गावातील पाण्यासाठी सार्वजनिक विहिरी व तलावांची व्यवस्था होती. परंतु खालच्या जातीतील लोकांना जसे की, महार, चांभार यांना सार्वजनिक विहिरी व तलावामधून पाणी घेण्यासाठी मनाई होती. त्यांच्यासाठी पाण्याची वेगळी व्यवस्था केली होती.'[6] त्यामुळे महारांना पाण्यासाठी व इतर आवश्यक असणाऱ्या बाबींसाठी अधिक संघर्ष करावा लागत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याही जीवनात पाण्यासाठी अनेक घटना घडल्याचे दिसून येते आणि म्हणूनच समानतेसाठी त्यांनी 'महाडचा सत्याग्रह' घडवून आणला.

## सामाजिक न्यायासाठी महाडचा सत्याग्रहः

मुंबई विधिमंडळात सी. के. बोले यांनी १९२३ साली सार्वजनिक उपयोगाच्या बाबी सर्वांना खुल्या असतील असा ठराव समंत केला होता. 'त्यानुसार ५ जानेवारी १९२४ रोजी महाड नगरपालिकेने चवदार तळे सर्वांना खुले असल्याचे जाहीर केले होते. तरीही महाडच्या अस्पृश्यांनी तळ्यावर जाऊन आपला हक्क बजावला नव्हता.'[7] डॉ. आंबेडकरांना पंढरपूरच्या विठोबा मंदिरात सत्याग्रह करावयाचा होता. मात्र, ते ठिकाण कायद्याच्या चाकोरीत बसत नसल्यामुळे रद्द करण्यात आले. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोकणातील जागा शोधण्यासाठी सांगितली. त्यानुसार अनंतराव चित्रेंनी महाड येथील चवदार तळ्याची जागा सत्याग्रहासाठी सुचविली.

महाडचे तळे कोणी बांधले याची नोंद इतिहासात नाही. याबाबत प्रा. राम बिवलकर व झुंबरलाल कांबळे म्हणतात, 'चौदा + दारे = चौदा दारावाटे पाणी वर येते म्हणून चवदार तळे'.[8] हे तळे कोणत्याही चौधरी नावाच्या व्यक्तीने बांधलेले नाही. त्यामुळे ते सार्वत्रिक तळे असल्याचे मानले जाते.

महाड सत्याग्रहाच्या बाबतीत प्रचार कार्य जोरात झाल्यामुळे जवळपास पाच हजार अस्पृश्य बांधव भाकऱ्या घेऊन सत्याग्रहासाठी उपस्थित राहिले होते. स्पृश्यांकडून पाणी न मिळाल्यामुळे चाळीस रूपयाचे पाणीही विकत घ्यावे लागले. १९ व २० मार्च रोजी सुरू झालेल्या सत्याग्रहासाठी पंच्याहत्तर वर्षाच्या वृद्धांपासून अनेक कार्यकर्ते व स्त्रियाही उपस्थित होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो अनुयायांसमवेत महाड तळ्यातील पाणी ओंजळीने प्राशन करून अस्पृश्य असल्याचे नाकारले. हे स्पृश्य, मनुवादी लोकांना सहन न झाल्यामुळे त्यांनी अस्पृश्य महारांवर हल्ला केला. यानंतर स्पृश्यवर्गाने अस्पृश्यांच्या स्पर्शाने बाटलेले तळे शुद्ध करण्यासाठी पंचगव्य टाकून तळ्याचे शुद्धीकरण केले.

अस्पृश्यांची झालेली अपमानाची भरपाई करण्यासाठी पुन्हा २५ व २६ डिसेंबर १९२७ रोजी डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह व परिषद घेण्यात आली. याच वेळी स्पृश्यांनी चवदार तळ्याच्या सत्याग्रहावर बंदी घालावी, अशी मागणी कलेक्टरकडे केली. त्यांची ही मागणी मान्य न झाल्यामुळे नऊ स्पृश्यांनी कोर्टात फिर्याद दाखल केली. यावेळी कोर्टाने अस्पृश्यांनी तळ्यावर पाणी भरण्यासाठी जाऊ नये असा मनाई हुकूम दिल्यामुळे त्या निर्णयाचे पालन डॉ. आंबेडकरांनी केले.

१७ मार्च १९३७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने महाडच्या चवदार तळ्याच्या बाबतीत निर्णय दिला. याबाबत प्रा. राम बिवलकर व झुंबरलाल कांबळे म्हणतात की, 'शेवटी जस्टीस ब्रुमफील्ड आणि जस्टीस एन. जे. वाडिया यांच्या बेंचने दि. १७ मार्च १९३७ या दिवशी सवर्ण हिंदूचे अपील फेटाळले. चवदार तळ्याची जमीन कोणाच्या मालकी हक्काची आहे, असे सवर्ण हिंदूना सिद्ध करता आले नाही. म्हणून ती सरकारी मालकीची म्हणजे सार्वजनिक ठरते. यामुळे चवदार तळ्यात पाणी भरण्याचा हक्क अस्पृश्यांना प्राप्त झाला. हायकोर्टाच्या या निकालाने तब्बल दहा वर्षांनी चवदार तळे अस्पृश्यांना खुले झाले'.[8]

महाडच्या सत्याग्रहामधून अस्पृश्यांना मानवी हक्क स्थापन करण्याबाबत विजय मिळाला. परंतु या सत्याग्रहाचा मूळ हेतू पाणी पिणे एवढाच नव्हता, तर सर्व मानवप्राणी समान आहेत, हे सिध्द करणे हा हेतू होता. म्हणूनच सत्याग्रहाबाबात डॉ. आंबेडकर म्हणाले होते की,' चवदार तळ्याचे पाणी पायल्याने तुम्ही, आम्ही अमर होऊ अशातला भाग नाही. आजपावेतो चवदार तळ्याचे पाणी प्यालो नव्हतो, तर तुम्ही आम्ही काही मेलो नव्हतो. चवदार तळ्यावर जावयाचे ते केवळ त्या तळ्याचे पाणी पिण्याकरिता जावयाचे नाही. इतरांप्रमाणे आम्हीही माणसे आहोत, हे सिद्ध करण्याकरिताच त्या तळ्यावर जावयाचे आहे म्हणजे ही सभा समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठीच बोलाविण्यात आली आहे!'[9]

## सारांशः

महाड सत्याग्रहाचे दूरगामी परिणाम दिसून आले. अस्पृश्य समाजात जागृतीची किमया या सत्याग्रहाने घडवून आणली होती. अस्पृश्य समाजातील महारांनी मृत प्राण्याचे मांस खाणे सोडून दिले. गावातून भीक मागणे बंद केले. जोहार घालणे बंद केले. त्यामुळे स्पृश्य समाजाने चिडून जाऊन अस्पृश्यांवर अन्याय अत्याचार करायला सुरवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्य समाजबांधवांनी घडवून आणलेला हा पहिलाच सत्याग्रह होता. त्यामुळे या सत्याग्रहाला आंबेडकरी चळवळीच्या दृष्टीने अधिक महत्व आहे. याच सत्याग्रहाच्या धर्तीवर महाराष्ट्रात अनेक सत्याग्रह केल्याचे दिसून येते.

## संदर्भः

१) आहूजा राम, 'भारतीय समाज', रावत पब्लिकेशन, जयपूर एवं नई दिल्ली २००२, पृ. १३
२) मून वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारत आणि मूकनायक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन मुंबई, प्रथमावृत्ती १९९०, पृ., १८४
३) आहूजा राम, पूर्वोक्त, पृ. १४
४) मून वसंत, पूर्वोक्त पृ. ०४
५) मून वसंत (संपा.), 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग व स्पिचेस खंड १', महाराष्ट्र शासन संस्कृती मंडळ, मुंबई, सन २०१०, पृ. १९
६) चौधरी के. के. (संपा.) 'रत्नागिरी व सांवतवाडी जिल्हा गॅझेटियर', मुंबई, गव्हर्नमेंट प्रेस, १९८०, पृ. ४१९
७) बिवलकर, कांबळे झुंबरलाल, 'महाडचा मुक्तीसंग्राम, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, द्वितीयावृत्ती, ऑक्टोबर १९९६, पृ. २८
८) कित्ता पृ. १५१
९) मून वसंत, हरि नरके (संपा.) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग १', डॉ. आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ., १११